**Government Polytechnic, Aurangabad.**
(An Autonomous Institute of Govt. of Maharashtra)
Osmanpura, Aurangabad - 431005
Phone: (Office) (0240) 2334724 / 2360781 (A.O.) 2345936, (P) 2353644
website: www.gpabad.ac.in
E-mail: : principal.gpaurangabad@dtemaharashtra.gov.in

**परिपत्रक :**

जा.क्र./शातंनिऔ/एक्युएसी/EC/2023/ 139
दिनांक : 09/05/2023

**विषय : 40 टक्केपेक्षा जास्त दिव्यांग विद्यार्थ्यांना वेळ वाढवून / लेखनिक मिळणेबाबत / परीक्षेकरीता वेगळी बैठक व्यवस्था करणेबाबत.**

उपरोक्त विषयी शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद ही महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था असून, त्या अंतर्गत उन्हाळी व हिवाळी पदविका परीक्षा घेतल्या जातात. परीक्षा कालावधीत परीक्षार्थींची वेळ वाढवून मिळणेबाबतचे किंवा लेखनिक मिळणेबाबत तसेच वेगळी बैठक व्यवस्थेबाबतअर्ज प्राप्त होतात.

सदरील सुविधा प्राप्त करण्याकरीता विद्यार्थ्यांनी विभागप्रमुखांमार्फत अर्ज **दिनांक 15 मे 2023 पर्यंत** सादर करावेत व विभागप्रमुखांनी खालील बाबी पडताळून सदर विद्यार्थ्यांचे अर्ज एकत्रितरीत्या आपल्या शिफारशींसह परीक्षा विभागास **दिनांक 17 मे 2023 पर्यंत** अग्रेषित करावेत जेणेकरून सदरील दिव्यांग परीक्षार्थींचे कार्यालयीन आदेश निर्गमित करून **Officer in Charge** उन्हाळी परीक्षा 2022-2023 (222) यांना कळविण्यात येईल.

**लेखी परीक्षेकरीता वेळ वाढवून मिळणेबाबत –**

1) विद्यार्थ्याचा अर्ज.
2) विभागप्रमुखांची सही व शिक्का नमूद केलेले पत्रासोबत खालील कागदपत्रे परीक्षा विभागास सादर करावीत.
3) संबंधित परीक्षार्थ्यांचे 40 टक्के पेक्षा जास्त दिव्यांग असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्राची साक्षांकित छायांकित प्रत.
4) परीक्षार्थ्यांचा नोंदणी क्रमांक, सत्र याप्रमाणे यादी.

**लेखनिक मिळणेबाबत –**

1) विद्यार्थ्याचा अर्ज व विभागप्रमुखांची सही व शिक्का नमूद केलेल्या पत्रासोबत खालील कागदपत्रे परीक्षा विभागास सादर करावीत.
2) विद्यार्थी असमर्थ असल्याबाबतचे डॉक्टरांचे वैद्यकीय प्रमाणपत्र.
3) लेखनिक म्हणून बसणा-या विद्यार्थी / विद्यार्थीनीचे बोनाफाईड प्रमाणपत्र.
4) लेखनिक म्हणून बसणा-या विद्यार्थी/विद्यार्थीनी तांत्रिक शिक्षण न घेतलेला व इयत्ता 10 वी पर्यंत शिकलेला/ली असावा/असावी.
5) लेखनिक म्हणून बसणा-या विद्यार्थी/विद्यार्थीनी हा परीक्षार्थीचा नातेवाईक आणि संस्थेचा कर्मचारी नसावा.
6) उपरोक्त अर्ज हे विभागप्रमुखांमार्फत परीक्षा विभागास एकत्रितरीत्या **दिनांक 17 मे 2023 पर्यंत** सादर करावेत.

**प्राचार्य,**
शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद.

**प्रत-** सर्व विभागप्रमुख - स्थापत्य/यंत्र/विद्युत/ स्वयंचल /अणुविद्युत/ माहिती तंत्रज्ञान/ संगणक/ AIML/ डीडीजीएम/APM.